शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार
कल्याण निधीच्या (Trust) कार्यकारी मंडळाची
नवीन समिती नियुक्त करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१७/प्र.क्र.११/३४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : -१४ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मावज-२००९/५७३/प्र.क्र.१०४/३४, दिनांक ८ ऑगस्ट, २००९

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मावज-२००९/५७३/प्र.क्र.१०४/३४, दिनांक १ जुन,२०१०

३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मावज-२०११/प्र.क्र.३८२/३४, दिनांक १७ ऑक्टोबर, २०११.

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मावज-२०१३/प्र.क्र.१३८/३४, दिनांक ६ जानेवारी, २०१४

५) संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क यांचे पत्र क्र. वृत्त/(२०१७)३/ शंचपकनि-समिती गठन./का-२/८५३, दिनांक १० ऑगस्ट,२०१७

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मावज-२०१७/प्र.क्र.११/३४, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटूंबियांना मदत करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या विश्वस्त संस्थेवरील (Trust) कार्यकारी मंडळ संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आले होते. सदर निधीच्या घटनेत कार्यकारी मंडळावरील अशासकीय सदस्यांची मुदत ३ वर्षे राहील अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या कार्यकारी मंडळावरील अशासकीय सदस्यांची मुदत संपुष्टात आली आहे. सदर निधीच्या (Trust) व्यवस्थापनासाठी नवीन कार्यकारी मंडळ तसेच पत्रकारांना तातडीच्या प्रसंगी मदत देण्यासाठी गठीत केलेल्या उपसमितीवरील अशासकीय सदस्य नियुक्तीची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या व्यवस्थापनासाठी विश्वस्त संस्थेच्या (Trust) कार्यकारी मंडळावर खालील सदस्यांची नियुक्ती करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ) **<u>शासकीय सदस्य</u>**.

१	प्रधान सचिव/सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई	अध्यक्ष
२	महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई	सदस्य
३	संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई	सदस्य सचिव
४	उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई	खजिनदार
५	उपसचिव/सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई	सदस्य

ब) <u>आमंत्रित अशासकीय सदस्य</u>

१	श्री.संदीप प्रधान	दै.लोकमत, मुंबई
२	श्री. संदीप आचार्य	दै.लोकसत्ता, मुंबई
३	श्री. जयप्रकाश पवार	दै.दिव्य मराठी नाशिक
४	श्री. अशोक चिंचोले	दै.भुकंप, लातूर
५	श्री. राहुल पांडे	दै.हितवाद नागपूर
६	श्री. गजानन जानभोर	दै.लोकमत, नागपूर
७	श्री.अनिरुध्द पांडे	दै.तरुण भारत, यवतमाळ

२. वर नमूद केलेल्या कार्यकारी मंडळाच्या ७ सदस्यांव्यतिरिक्त प्रस्तावित विश्वस्त संस्थेच्या कार्यकारी मंडळावर खालीलप्रमाणे १० निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करण्यासही या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

क) <u>निमंत्रित शासकीय सदस्य</u>

१	उप सचिव/सहसचिव,	गृह विभाग
२	उप सचिव/सहसचिव,	सामान्य प्रशासन विभाग (का-३४)

ड) <u>निमंत्रित अशासकीय सदस्य</u>

१	अध्यक्ष	मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ किंवा पुरस्कृत प्रतिनिधी
२	अध्यक्ष	मराठी पत्रकार परिषद किंवा पुरस्कृत प्रतिनिधी
३	अध्यक्ष	पुणे श्रमिक पत्रकार संघ किंवा पुरस्कृत प्रतिनिधी
४	अध्यक्ष	महाराष्ट्र संपादक परिषद किंवा पुरस्कृत प्रतिनिधी निधी
५	अध्यक्ष	नागपूर श्रमिक पत्रकार संघ किंवा पुरस्कृत प्रतिनधी
६	अध्यक्ष	इलेक्ट्रॉनिक माध्यमे पत्रकार संघटना किंवा पुरस्कृत प्रतिनिधी
७	अध्यक्ष	महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ किंवा पुरस्कृत प्रतिनिधी
८	अध्यक्ष	मुंबई स्पोर्टस् जर्नलिस्ट असोसिएशन किंवा पुरस्कृत प्रतिनिधी

३. सदर कार्यकारी मंडळावरील सर्व अशासकीय सदस्यांना कार्यकारी मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३ मार्च, २०१० च्या परिच्छेद १२ मधील तरतुदीनुसार रु.८९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचा-यांच्या दराने प्रवास भत्ता व दैनिक भत्त अनुज्ञेय असेल, मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

४. सदर सदर समितीची मुदत या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीन वर्षे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११४१५४६१२८७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2017.11.15 13:42:25 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व सदस्य, विश्वस्त संस्था
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (मा. व .ज.) यांचे खालगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७. स्वीय सहायक, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग/विधी व न्याय विभाग/ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

८. स्वीय सहायक, सह/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मा.व ज.)/सार्वजनिक आरोग्य विभाग/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

९. धर्मादाय आयुक्त, वरळी, मुंबई

१०. उपसंचालक (वृत्तशाखा) (प्रकाशने) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांजकडे प्रसिध्दीसाठी,

११. उपसंचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली.

१२. सर्व उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,

१३. सर्व जिल्हा माहिती अधिकारी,

१४. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेय), मुंबई/नागपूर

१५. महालेखापाल १/२ (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर

१६. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

१८. निवड नस्ती.